International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.3 Jan–Feb- 2022

# पूर्व मध्ययुगीन काळातील सामाजिक स्थिती . एक चिकित्सा

**प्रा. डॉ. लोंढे संदिप गोविंदराव**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

भारतीय इतिहासाचा अभ्यास करित असतांना तो अनेक अंगानी करावा लागतो. मग तो आर्थिक, राजकीय किंवा सामाजिक अशा बाजूंनी अभ्यास करावा लागतो. भारतीय इतिहास समजून घ्यायच्या दृष्टिने आपण प्राचिन, मध्ययुगीन व अधुनिक असे विभाजन करतो. यातील मध्ययुगात भारतीय समाजात असंख्य असे बदल घडुन आलेले दिसतात. व त्या बदलांचे जर बारकाईने अध्ययन करण्यात आले. तर आजच्या आधुनिक भारतासमोर किंवा समकालीन भारतासमोर ज्या समस्या, प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यांची पाळेमुळे आपणास प्राचिन व मध्ययुगीक काळात पाहायला मिळतात. व त्यातल्या त्यात इ. सनाचे ७ वे शतक ते ११ वे शतकच्या दरम्यानच्या काळात भारतीय इतिहासात आमुलाग्र असे बदल जाणवतात. याच दरम्यानच्या काळालाच आपण अभ्यासाच्या दृष्टिने भारतीय इतिहासातील पूर्व मध्ययुगीन कालखंड असे संबोधतो.

पूर्वीपासूनच हिंदू समाजाचे चातुर्वर्ण्य पध्दतीमुळे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार प्रमुख्य वर्णांमध्ये विभाजन झालेले होते. यापैकी पहिल्या तिनही वर्णांना समाजात उच्च दर्जा होता. तर शुद्र या वर्णाला वरिल तिनही वर्णांची सेवा करावी लागत असे. पूर्व मध्ययुगीन काळात वरवर बघता इतर काळांप्रमाणे समाजाची स्थिती असली तरी बारकाईने या काळाचा अभ्यास केल्यास हे समजून येईल की, बदलांना सुरूवात झाली होती. व त्यांचे परिणाम भारतीय समाजात नंतरच्या काळात दिसून यायला लागले होते.

या काळातील समाज जीवन जाणून घेण्यासाठी अनेक महत्वपूर्ण साधनांचा अभ्यास करता येईल. यामध्ये नाणी, शिलालेख, दानपत्रे, शिल्पे, चित्रकला तसेच या कालखंडातील विविध शासकांनी आश्रय दिलेल्यामुळे निर्माण झालेल्या साहित्यीकांच्या साहित्यातून आपणास या कालखंडातील सामाजिक जीवनात झालेल्या बदलांचा अभ्यास करता येईल ज्यात, याईवल्वय स्मृती, नारद स्मृती, कालीदासांचे ग्रंथ, मनुस्मृती, नीतिवाक्यमृत अष्टाध्यायीसारख्या ग्रंथांच्या साह्याने अध्ययन करता येईल. तसेच या काळात भारतात आलेल्या परकीय प्रवाशांच्या वृत्तांताचा किंवा ग्रंथाचा ही अभ्यास करता येईल. ज्यात अलइद्रिस, अल्बेरूनी, इब्ज खुदब्दी यांच्या ग्रंथांचा अभ्यास करता येईल.

या सर्वांच्या अभ्यासातून एका एका वर्णात झालेले बदल यांचा अभ्यास खालीलप्रमाणे करता येईल.

**ब्राम्हण :-**

ब्राम्हण हा समाजव्यवस्थेत वरचा दर्जा असणारा सर्व प्रमुख घटक आहे. पूर्व मध्ययुगीन काळातही ब्राम्हण हा वरचा वर्ग असला तरी या काळात याच वर्गातील एक घटक इतर व्यवसायाकडे वळल्याचे पाहायला मिळते.[१] पाणिंनी काळात 'ब्रम्हण' हा शब्द अध्यात्मिक गुणसंपदेसाठी वारला जात असे तर ब्राम्हण हा शब्द जन्माने मिळालेल्या जातीबद्दल वापरण्यात येत असे.[२] पाणिनीनेही ब्राम्हणाचे प्रामुख्याने दोन वर्ग पाडले आहेत. पहिला वर्ग हा वेद, वेदांचे अध्ययन यासारख्या धार्मिक क्रिया पार पाडत असे. त्या बदल्यात त्या-त्या काळातील राजे त्यांना गावे संपत्ती दान म्हणून देत असत. हे या काळात देण्यात आलेल्या अनेक शिलालेखांवरून समजते. उदा. शिलाहार राजा गंडरादित्य याने (इ.स. ११२६) मध्ये कोल्हापूर येथील ब्रम्हपूरी या गावातील ब्राम्हणांना त्यांच्या चरितार्थ चालविण्यासाठी जमीन दान दिल्याचे उदाहरण कोल्हापूर ताम्रपटातून[३] दिसून येतो. या व्यतिरिक्त ब्राम्हणांचा दूसरा वर्ग जो क्षत्रिय व वैश्य वर्णांची कामे करीत असे. उदा. अळतेकर म्हणतात की, राष्ट्रकुट राज्याच्या दरबारी बरेच ब्राम्हण मंत्रिपदावर असत. चालूक्य दरबारी असलेला मुख्यमंत्री 'धल्ल' हा ब्राम्हण होता.[४]

कदंबांच्या काळात ब्राम्हण वर्णाने सैन्य व व्यापारामध्ये प्रवेश केला होता.[५] अल्बेरूनीने तर ब्राम्हणांच्या जीवनाला चार भागात विभाजीत केले आहे.[६] प्रत्येक भागात त्याने कर्तव्य करावीत यावरून हे सिध्द होते की, ब्राम्हण वर्ग धर्माच्या क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही महत्वाची भूमिका बजावत होता.

**क्षत्रिय :-**

वर्णव्यवस्थेतील द्वितीय स्थानी असलेला वर्ग म्हणजे क्षत्रिय वर्ग होय. या वर्गाचे प्रमुख कार्य हे युध्दामध्ये भाग घेणे. प्रजेचे रक्षण करणे व प्रत्येक वर्णातील लोकांना त्यांच्या वर्णाप्रमाणे आचरण करायला

---

१. अ.श. पाठक व इतर, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास प्राचीन काळखंड, पृ. ६१६.

२. वा. अग्रवाल, पाणिनिकालीन भारतवर्ष, पृ. १६२

३. शा.भा. देव, महाराष्ट्र व गोवे-शिलालेख-ताम्रपटाची वर्णनात्मक संदर्भ सूची (अळस ताम्रपट), पृ. १२३

४. अ.श. पाठक व इतर, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास प्राचीन काळखंड, पृ. ६२१.

५. R.C. Majumdar, Studies In the Culture History of India, P. 17

६. नूर. नब्बी. अब्बासी (अनु.) (एडवर्ड सी. सखाऊ) भारत : अलबिरूनी पृ. २१.

भाग पाडणे. आपस्तंभ सुत्रामध्ये क्षत्रियांच्या कर्तव्याविषयी चर्चा करण्यात आली आहे. ज्यात सांगितले आहे की, राजाने आपले गुरू व आमात्य यांच्यापेक्षा जास्त ऐश्वर्याने राहू नये. त्यांच्या राज्यात रोगाने, थंडीने किंवा उष्मघाताने कोणीही मृत्यु पावू नये, शरण आलेल्या शत्रूला ठार मारू नये.[७] राजा भोज द्वितीयने (इ.स.११६१ करोळी ताम्रपटात स्वतःचे क्षत्रिय शिखमणी असे वर्णन केले आहे.[८]

क्षत्रियांच्या बाबतीत अल्बेरूनी म्हणतो की, क्षत्रिय वेद अध्ययन करू शकत असत. वेदांना ते कंठस्थ करू शकत असत. पण वेदांची शिक्षा मात्र त्यांना देता येत नसे. त्यांना पुराणांमध्ये दिलेल्या विधीप्रमाणे आचरण करावे लागत असे. त्यांचे मुख्य कार्य प्रजेवर शासन करणे व त्यांची रक्षा करणे हे होते.[९] कामांदकाने रचलेला नीतिसार हा ग्रंथ यांच विषयावर आहे. यात क्षत्रियांच्या दिनचर्येसंबंधी विभागणी केली आहे.

याचकाळात क्षत्रियांच्या बाबतीत एक महत्वपूर्ण बदल घडत होता. तो म्हणजे ब्राम्हण वर्ग क्षत्रीयांच्या क्षेत्रात प्रवेश करित होता. ही बाब चिनी प्रवाशी ह्यु-एत्संग च्या प्रवासवर्णनावरुन कळते, त्याने भारत भेट दिली. तेव्हा पाच क्षत्रिय, तीन ब्राम्हण, दोन वैश्य व दोन शुद्र राज्य करित होते.[१०] यावरुन एक बाब लक्षात येते की, इ.स. पूर्व ६ व्या शतकात जेव्हा क्षत्रियांनी धर्माच्या क्षेत्रात प्रवेश करुन स्वतःचे वर्चस्व सिध्द केले.[११] त्याचा उलट प्रकार ब्राम्हणांनी क्षत्रियांच्या क्षेत्रात प्रवेश करुन केला असे वाटते.

**वैश्य :-** वर्ण व्यवस्थेतील हा तीसरा घटक होय. या वर्गातील लोक प्रामुख्याने शेती व्यवसाय, व्यापार करीत असत. या वर्णातील व्यक्तींकडे संपत्ती असल्यामुळे त्यांनी सांस्कृतिक विकासात महत्वाची भुमिका बजावल्याचे दिसून येते. या वर्गाच्या योगदानातून पितळोरा, कान्हेरी, जून्नर, कार्ले, भाजे, बेडसा, नासिक, अजिंठा आदी लेण्या कोरल्या गेल्या. व्यापाऱ्यांनी धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात फार मोठया प्रमाणात हातभार लावल्याच्या नांदी या लेण्यांमधील अनेक शिलालेखात सापडतात.[१२]

७. वा.व. निराशी, सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, पृ. १३२.

८. अ.श. पाठक व इतर, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास प्राचीन काळखंड, पृ. ६२७.

९. नूर. नब्बी. अब्बासी (अनु.) (एडवर्ड सी. सखाऊ) भारत : अलबिरूनी पृ. २१८.

१०. अ.श. पाठक व इतर, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास प्राचीन काळखंड, पृ. ६२७.

११. वि.पाण्डय, (अनु.) (बाशम.ए.एल) अदभूत भारत, पृ. ६६

१२. रा.श्री. मोरवंचीकर, सातवाहनकालीन महाराष्ट्र, पृ. ६२.

कान्हेरी येथील ३७ व्या लेण्यांतील व्हरांडयाच्या डाव्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत कोरलेला आहे. या लेखात पाण्याचे टाके व लेणे दान दिल्याचे नमुद केले आहे.[१३]

वैश्य वर्गाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या वेगवेगळ्या व्यवसायांवरुन श्रेणी निर्माण झाल्या होत्या. त्यांच्या माध्यमातून ते आपले हितसंबंध सांभाळत असत. संघटितपणे कार्य करणाऱ्या लक्ष्मदेश्वर येथील विणकरांच्या श्रेणीचा (इ.स. ७७५) उल्लेख हा कोरीव लेखात मिळते.[१४]

याकाळात वैश्य वर्गाची आर्थिक स्थिती इतकी सुधारली होती की, कदंब राजा कुकुस्थवर्मन जो ब्राम्हण होता. त्याने आपल्या मुलीचा विवाह एका वैश्य राजकुमाराशी केला होता.[१५] एकंदरीत वैश्यांचे स्थान समाजात महत्वपूर्ण होते.

**शूद्र :-** शूद्र हा प्रचलित समाज व्यवस्थेतील अंतीम घटक असूनही या कालखंडात या वर्गात महत्वपूर्ण असे बदल घडण्यास सुरुवात झाली होती. अंगच्या गुणामुळे समाजात मानाचे स्थान प्राप्त करुन घेत होते.[१६] त्यापैकी शिल्पी, विणकर, सोनार, गंधिक हे होते. मिताक्षराच्या वर्णनाप्रमाणे देवलने शूद्रांनी द्विन जातीयांची सेवा करावी असे सांगितले आहे. पण त्याबरोबरच ते शेती पशुपालन, भारवाह, वस्तुविक्री हे व्यवसाय करु शकतात असेही म्हटले आहे.[१७] काही शुद्रांनी सैनिकी पेशाही स्वीकारला होता. शूद्रांमध्ये मोची, चांभार, ढोर असे तीन प्रकारचे भेद निर्माण झाले होते. त्यामुळे शूद्रांमध्येही पोटभेद पडल्याचे दिसून येते. वरील चारही वर्णा व्यतिरिक्त समाजात संमिश्रता असलेला एक वर्ग तयार झाला होता. त्यात रोटी-बेटी व्यवहार चालत असत. अनुलोम, तिल्लोम विवाहसुध्दा होत असत. ज्यामुळे या कालखंडात संमिश्र अशा नवीन जाती निर्माण झाल्याचे पाहायला मिळते.

१३. शां.भ. देव, महाराष्ट्र व गोवे शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक सूची, पृ. ७५.

१४. मु.ग. पानसे, यादवकालीन महाराष्ट्र, पृ. ६२.

१५. R.C. Majumdar, Studies In the Culture History of India, P. 179-

१६. श.श्री. मोरवंचीकर, सातवाहनकालीन महाराष्ट्र, पृ. १५२.

१७. अ.श. पाठक व इतर, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास प्राचीन काळखंड, पृ. ६३१.

**प्रा. डॉ. लोंढे संदिप गोविंदराव**